Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# किशोरी उत्कर्ष मंचातील मुलींच्या समस्या आणि कार्यकारी मंडळातील सदस्याची भूमिका व कर्तव्ये

**श्रीमती ज्योत्स्ना गजेंद्र मैंदाड**
संशोधिका

**डॉ. महेश गं. कळलावे**
मार्गदर्शक सहाय्यक प्राध्यापक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
उपपरिसर उस्मानाबाद.

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाच्या माध्यमातून माध्यमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आणि मुलींचे शिक्षण, त्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना करणे, तसेच कार्यकारी मंडळ आणि प्रशासकीय स्तरावरून केले जाणारे सनियंत्रण यांच्या आधारे किशोरी उत्कर्ष मंचाची स्थापना केली जाते. हा किशोरी उत्कर्ष मंच माध्यमिक स्तरावर म्हणजे (इयत्ता 9 वी व 10 वी) वर्गात शिकणाऱ्या मुलींसाठी कार्य करत असतो.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान आणि त्यामधील किशोरी उत्कर्ष मंच यांचे हेतू पुढील प्रमाणे आहेत. शिक्षणातील गळतीचे प्रमाण शून्यापर्यंत आणणे, एकूण नोंदणीचे प्रमाण वाढविणे, माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्यात येणारे अडथळे उदा. अपंगत्व, अर्थिक आणि प्रतिकूल सामाजिक परिस्थिती, भौगोलिक स्थिती व लिंगभेद यामुळे येणारे अडथळे दूर करणे. अशा उद्दिष्टांच्या अनुषंगाने चालून माध्यमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे काम केले जाते. महाराष्ट्रातील सद्यस्थितीतील मुलींच्या शिक्षणामध्ये गुणवत्तापूर्ण सुधारणा करण्यासाठी फक्त शासकीय माध्यमिक स्तरावर प्रयोगिक तत्वावर किशोरी उत्कर्ष मंच हा उपक्रम सुरू केला गेला आहे. या मंचामध्ये माध्यमिक स्तरावरील मुलींचा सहभाग असतो. म्हणजे इयत्ता 9 वी व 10 वी च्या वर्गातील मुली यामध्ये सहभागी होतात. या मुली उच्चप्राथमिक शिक्षण पूर्ण करून आलेल्या असतात. त्यांचे वाढते वय तसेच घर व समाजाकडून वाढलेल्या अपेक्षा व त्यांच्या वाढत्या वयामुळे त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन यामुळे मुलींना वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. याचा परिणाम म्हणून माध्यमिक स्तरावर मुलींची गळती आणि स्थगितीचे प्रमाण वाढते. त्यामुळे या सर्व समस्या अंशतः किंवा पूर्णतः कमी करण्याचे काम किशोरी उत्कर्ष मंच करतो. त्या समस्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

**मुलींच्या समस्या :**

मुलींना वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या येतात. शिक्षण घेण्यासाठी त्या कुटुंबानंतर जास्तीत जास्त वेळ शाळेत असतात, म्हणून शाळेसंबंधित समस्या पाहणे आवश्यक आहे.

**1) शाळेसंबंधीच्या समस्या :**

शाळा हा मुलींच्या जीवनातील कुटुंबानंतरचा महत्वाचा घटक आहे. यामध्ये असणारे वेगवेगळे घटक म्हणजे शिक्षक, आंतरक्रिया, भौतिक सुविधा आणि अभ्यासक्रम यांचा मुलींच्या समस्यांशी जास्त संबंध येतो.












वरील प्रमाणे वेगवेगळ्या रचनेच्या आधारे आपणास शाळेसंबंधी असणाऱ्या समस्या स्पष्ट करता येतात. या सर्व समस्यांचा परिणाम म्हणून मुली अधिक वर्षे एकाच वर्गात राहतात, आपोआप गळती वाढते तसेच अनुपस्थिती सुद्धा वाढते.

**2) कौटुंबिक समस्या :**

कौटुंबिक समस्या स्थल, कालपरत्वे वेगवेगळ्या असतात. या विविध प्रकारच्या कौटुंबिक समस्यांमुळे मुलींना शिक्षणापासून वंचित रहावे लागते. म्हणूनच एक वंचित घटक आणि शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास अडसर निर्माण करणारा घटक म्हणून याकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी किशोरी उत्कर्ष मंचाच्या माध्यमातून पुढील कौटुंबिक समस्यांचा आढावा घेण्यात आला आहे.



वरील कौटुंबिक समस्या तसेच मुली व पालक यांच्यातील सहसंबंधाच्या अभाव अशा वेगवेगळ्या कारणांमुळे बऱ्याचदा मुलींवर कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतात. त्यामुळे कधी-कधी मध्येच शिक्षण सोडवे लागते तर कधी-कधी लग्न सुद्धा करावे लागते. या सर्व समस्यांचा किशोरी उत्कर्ष मंचामार्फत विचार करून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला जातो.

**3) सामाजिक समस्या :**

आपला भारत हा खेड्यांचा देश असून यामध्ये रूढीप्रिय समाज जास्त प्रमाणात आहे. या समाजात अनेक वाईट रूढी, प्रथा, परंपरा अतिशय खोलवर रूजलेल्या आहेत. यामधील एक म्हणजे लिंगभेद आणि वंशाच्या दिव्याबद्दलची माणसाच्या मनात रूजलेली मुलांशिवाय कुटुंबाचा उद्धार होणार नाही अशी विचित्र मानसिकता समजातील निम्न स्तर, मध्यम स्तर आणि उच्च स्तर या सर्व स्तरांमधून पहायला मिळते. या सर्व वातावरणामुळे मुलींना अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांचा पुढील प्रमाणे आढावा घेता येतो.




किशोरी उत्कर्ष मंचातील किशोरवयीन मुलींना अशा वेगवेगळ्या समस्या निर्माण होत असतात. त्यांची वरील मुद्याच्या माध्यमातून चर्चा केली असून मुलींना या सर्व समस्यांच्या जाळ्यातून बाहेर काढून शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी किशोरी उत्कर्ष मंच कार्य करतो. त्यामुळे आपणास मंचाच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांच्या भूमिकांचा आढावा घेणार आहोत.

**कार्यकारी मंडळातील सदस्यांची भूमिका व कर्तव्ये :**

किशोरी उत्कर्ष मंचाच्या कृती कार्यक्रमांची तसेच मुलींचा व्यक्तीमत्व व गुणात्मक विकास करणाऱ्या उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मंचाच्या कार्यकारी मंडळाची स्थापना केली जाते. कार्यकारी मंडळाची स्थापना केली जाते. कार्यकारी मंडळातील संबंधित घटकांची भूमिका व कर्तव्ये आपणास खालील प्रमाणे स्पष्ट करता येतात.

**लोकप्रतिनिधी महिला :**

1) ग्रामसभेत विषयपत्रिकेत मुलींचे शिक्षण या विषयावर अंतर्भाव करणे व यावर चर्चा करणे.
2) मुलींच्या शिक्षणाविषयी जनजागृती व्हावी या दृष्टीने सांस्कृतिक पथनाट्य इ. कार्यक्रम राबविणे.
3) मुलींची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वउत्पन्नातून योजना अथवा नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे (जि.प. / पं.स. अंदाजपत्रकात महिला व बाल विकास किमान 10 टक्के तरतूद समाजकल्याण जि.प. / पं.स. अंदाजपत्रकात किमान 20 टक्के तरतूद तसेच ग्रामपंचायत अंदाजपत्रकात किमान 15 टक्के तरतूद)
4) मंचाच्या उपक्रमासाठी ती साधनसामुग्री लोकसहभागातून मिळवून देण्यासाठी सहाय्य करणे.
5) लहान भावंडे सांभाळणाऱ्या किशोरवयीन मुलींसाठी शाळेच्या परिसरात चाईल्ड केअर सेंटर सुरू करण्यासाठी प्रयत्न करणे.

**मुख्याध्यापक :**

1) मुलींसाठी भौतिक सोयीसुविधा आणि मुलींची सुरक्षितता या सर्व बाबींचा पाठपुरावा करणे.
2) मुलींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मासिक सभेत चर्चा घडविणे, अभ्यासामध्ये अप्रगत राहणाऱ्या मुलींसाठी उपाययोजना करणे.
3) शैक्षणिक साहित्याच्या पूर्ततेची पाहणी करणे.
4) मंचाच्या बैठकीत मुलींच्या शिक्षणाविषयी त्यांच्या विविध समस्यांविषयी, शाळेतील मुलींच्या गळतीच्या अनुपस्थितीच्या अनुषंगाने शालेय स्तरावरील कारणाचा शोध घेऊन त्यावरील उपाययोजना राबविणे.
5) शिक्षकांशी सतत चर्चा करणे व मुलींसाठीच्या विविध उपक्रमांमध्ये शिक्षकांना सहभागी करून घेणे.
6) शाळेत सूचनापेटी उपलब्ध करून देणे.
7) मासिक बैठकांचे नियमितपणे आयोजन करण्यास सदस्य सचिव यांना मार्गदर्शन करणे मंचाच्या निर्णयांची अंमलबजावणीस सहकार्य करणे.

**शिक्षक (पुरूष) :**

1) शाळेतील मुलींसाठी भयमुक्त सुरक्षित व विश्वासाचे वातावरण तयार करणे.
2) शालेय स्तरावरील सर्व स्पर्धा व उपक्रमांमध्ये मुलींना समान संधी उपलब्ध करून देणे.
3) मुलींना आवश्यकतेनुसार समुपदेशनासाठी सहाय्य करणे.
4) मुलींसाठी समस्या ठरत असलेल्या मुलांशी संवाद साधणे.

**शिक्षक (महिला) :**

1) मुलींना बोलते करून त्यांच्या व्यक्तिगत प्रश्नांविषयी सुसंवाद साधणे.
2) मुलींच्या विशेष समस्या ओळखून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.
**3)** आवश्यकतेनुसार त्यांना समुपदेशनासाठी प्रयत्न करणे.

**अंगणवाडी सेविका :**

1) एकात्मीक बालविकास सेवा योजनेच्या विविध कार्यक्रम योजनांची माहिती किशोरी उत्कर्ष मंचाला देणे.
2) किशोरवयीन मुलींची शिक्षणाबाबतची सद्यस्थिती मंचाला कळविणे म्हणजे इ. 8 वी तून इ. 9 वीत गेलेल्या व इ. 9 वी तून 10 वीत गेलेल्या मुलींची यादी करून मंचाला सादर करणे.
3) 14 ते 18 वयोगटातील शाळाबाह्य मुलींची यादी मंचाला सादर करणे.
4) एकात्मिक बालविकास योजनेद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ संबंधितांना देणे.

**स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी :**

1) मंचातील मुलींसाठी समुपदेशन करणे तसेच व्यक्तिमत्व विकास.
2) पालक व शिक्षकांसाठी समुपदेशन विषयावर मार्गदर्शन सत्र आयोजित करणे.
3) मुलींची शालेय अनुपस्थिती व गळती तसेच मुलींच्या विविध अडचणी याविषयी मुख्याध्यापक व शिक्षकांशी चर्चा करून त्यामधील कारणमीमांसा करून त्याबाबत उपाययोजना राबविण्यासाठी सहाय्य करणे.
4) मासिक बैठकांना नियमितपणे उपस्थित राहणे.
**5)** बालकामगार कायदा 1986 बद्दल जागृती करणे. 14 वर्षाखालील काम करणाऱ्या मुलींना कामावर न ठेवता शाळेत पाठविणे यासाठी संबंधित पालकांना सांगणे. अशा बालकामागारांची माहिती कामगार विभागास कळविणे.

**पालक प्रतिनिधी :**

1) मुलींच्या बाबतीत शैक्षणिक, कौटुंबिक, सामाजिक, व्यक्तिगत स्वरूपाच्या समस्यांना मंचामार्फत मांडून त्यावर चर्चा करणे.
2) मुलींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सकारात्मक चर्चा घडवून आणणे.

3) मंचात सहभागी अथवा गावातील / परिसरातील मुलींच्या पालकांना मार्गदर्शन करणे.

**विद्यार्थिनी प्रतिनिधी :**

1) विद्यार्थिनी प्रतिनिधीचे मुलींचे मंचाच्या बैठकीत मांडणे.
2) मंचाबद्दल शाळेतील विद्यार्थिनीमध्ये आवश्यक वातावरण तयार करणे व जागृती करणे.

**ए.एन.एम. :**

1) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मदतीने आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे.
2) मुलींच्या शारिरीक व मानसिक वाढ व विकासाविषयी तसेच आरोग्य विषयक बाबींवर वेळोवेळी मार्गदर्शन करणे.
**3)** प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत अंगणवाड्या व शाळांना भेटी देवून वैद्यकीय सेवा पुरविणे.

**सदस्य सचिव :**

1) शाळास्तरावर कार्यकारणी नियुक्त झाल्यावर सर्व सदस्यांना बोलावून महिन्यातून एकदा बैठक घेणे. या बैठकीची सर्व सदस्यांना 10 दिवस अगोदर लेखी स्वरूपात सूचना देणे.
2) पुढील बैठकीची रूपरेषा व कृती योजना आखणे.
3) मुलींची गळती होण्यामागच्या कारणांविषयी सदस्यांशी चर्चा करणे. या कारणांची एक यादी तयार करणे व त्याप्रमाणे फेरतपासणी करणे.
4) मुलींच्या विकासासाठी कोणते घटक महत्त्वपूर्ण आहेत याचा शोध घेणे व विकासात्मक कृती आराखडा तयार करणे.
5) अनाथ मुलींसाठी शासनाच्या विविध वस्तीगृहांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.
6) मुलींसाठीच्या विविध योजनांची माहिती मंचाला देणे.
7) किशोरवयीन मुली या लौंगिक छळाला बळी पडू नयेत यासाठी मुलींना जीवन कौशल्याच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे.
8) मंचामध्ये झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही होईल यासाठी मुख्याध्यापक शिक्षक व अन्य आवश्यक घटकांचे सहकार्य मिळविणे.
9) मुलींच्या शैक्षणिक प्रगतीविषयी वर्गशिक्षकांकडून माहिती घेऊन मंचाच्या बैठकीमध्ये चर्चा घडविणे.

**समारोप :**

अशाप्रकारे आपण प्रथम या संशोधन पेपरच्या माध्यमातून किशोरी उत्कर्ष मंचातील मुलींना येणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेतला आहे. या सर्व समस्या दूर करून मुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्व करणे व ज्ञानाचा प्रस्फोट झालेल्या या माहितीजालाच्या जगात त्यांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवणे यासाठी किशोरी उत्कर्ष मंचाची शासकीय प्रशालांमधून स्थापना केली आहे. मंचाच्या कार्यकारणी मंडळातील सदस्यांनी जर आपापले काम निकषांनुसार व्यवस्थित पार पाडले तर किशोरी उत्कर्ष मंच जास्तीत जास्त यशस्वी होईल व माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींचा मार्ग सुकर होईल.

**संदर्भ सूची**

1. Koul, L. (2007). Methodology of Educational research and Techniques. New Delhi : Vikas Publishing House.
2. मुळे, र. श., उमाटे वि. तु. (1988). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. पुणे : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
3. वायदंडे, शशिकांत (2010). (संपादक) पुणे : यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधनी (यशदा).

**संदर्भ वेबसाईट**

4. www.yashada.org/utkarsh